|| श्री गजानन प्रसन्न ||
|| श्री केशवराज प्रसन्न ||

देवधर मंडळ

# आपली आहे प्रगतीची
# वाटचाल

* वर्ष २३ वे, अंक २ * दि. १५ जून २०२३ * किंमत रु. २०/-



सांगली संमेलनात प्रमुख पाहुणे
श्री. विनायक देवधर यांच्या हस्ते
श्री केशवराज पूजन




जीवन गौरव पुरस्कार
स्वीकारताना
श्री. अविनाश देवधर




नलिनी मनोहर चतुरस्त्र
व्यक्तिमत्व पुरस्कार
स्वीकारताना
डॉ. काशिनाथ देवधर




कै. वि. शं. देवधर
स्मृति गौरव पुरस्कार
स्वीकारताना
श्री. जगदीश देवधर




कमलाबाई केशव
देवधर स्मृति गौरव
पुरस्कार
स्वीकारताना
डॉ. प्राजक्ता देवधर

# अध्यक्षांचे मनोगत



नमस्कार,

२८ मे २०२३ रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची १४० वी जयंती देशभरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

सावरकरांचे वर्णन राष्ट्रभक्तिची धगधगती ज्वाला, अखंड हिंदू राष्ट्राचे पुरस्कर्ते, भारतीय क्रांतिकारकांचे मुकुटमणी, हिंदू तेज सूर्य, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अग्रनेते, विचारवंत, तत्वज्ञ अशा अनेक विशेषांनी करता येईल. पण मला प्रकर्षाने पटलेलं, आवडलेलं विशेषण म्हणजे .. 'शब्दसूर्य'.

त्यांनी लिहिलेली अनेक गीते, कविता, नाट्यपदे ऐकताना, वाचताना, त्यांची नाटके वाचताना, इतर साहित्य वाचताना ते खरंच 'शब्दसूर्य' आहेत हे पटते.

सागरा प्राण तळमळला, जयोस्तुतेऽ महन्मंगले, अनादि मी अनंत मी, जयदेव जयदेव जय जय शिवराया, शतजन्म शोधिताना अशा या अजरामर असलेल्या गाण्यातील शब्दरचना, आवेश पाहा. अंगात स्फूर्ती संचारून कार्य करण्याची प्रेरणा देणारे शब्द!

या सावरकर जयंतीच्या सुमुहूर्तावर दिल्ली येथे नवीन संसद भवनाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. त्यामुळे हा दिवस कायम संस्मरणीय राहील. या सोहळ्याचा आनंद आपण दूरदर्शनच्या माध्यमातून घेतला. असो.

देवधर मंडळाच्या ३/४ फेब्रुवारी २०१८ रोजी संपन्न झालेल्या सुवर्णमहोत्सवी संमेलनाची परंपरा या वर्षी दि. ६/७ मे २०२३ रोजी सांगली येथे संपन्न झालेल्या वार्षिक स्नेहसंमेलनाने चालू ठेवली आहे.

या संमेलनाचा वृत्तांत अंकात दिला आहेच. तो वाचून पुन:प्रत्ययाचा आनंद घेता येईल.

या संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे शनिवार दि. ६ मे २०२३ रोजी सादर झालेल्या मनोरंजनात्मक कार्यक्रमाबरोबरच आपल्यातीलच काही तरुण यशस्वी उद्योजकांचा परिचय आणि त्यांनी आपल्या उद्योगांविषयी दिलेली माहिती आपल्यातील तरुणांना नक्कीच प्रेरणदायी ठरेल. नोकरी शोधणारे होण्यापेक्षा नोकरी देणारे होणे केव्हाही श्रेयस्करच!

आणि एक उल्लेखनीय बाब म्हणजे आपली स्मरणिका 'सफर देशविदेशाची' छायाचित्रांसह देशविदेशातील सहलींची वर्णने सहलीचा आनंद मिळवून देईल. ही स्मरणिकाही दरवर्षीप्रमाणे वाचनीय, प्रेक्षणीय आणि संग्राह्य झाली आहे.

स्मरणिका आपल्या सर्व व्हॉट्स ॲप ग्रुपवरही आहे. वेबसाईटवरही आहे.

आपली आनंद मेळाव्याची परंपरा निरनिराळ्या शहरातून आयोजित करावी असा मानस आहे. परंतु त्यासाठी त्या त्या शहरात राहणाऱ्या कुलबांधवांनी पुढाकार घेणे तुम्ही तयारी केली की आपण त्या त्या शहरात आनंद मेळावे घेऊ.

पान क्र. ७ वर

# देवधर मंडळ कार्यकारिणी

## दि. १ /४/२०१९ ते दि. ३१/३/२०२४

✻ **अध्यक्ष**

**सी.ए. सुरेश विश्वनाथ देवधर** (कु. वृ. पान २१/१६२)
१०२, आय विंग, प्रणय नगर, राममंदिर रोड (विस्तारित), बाभई, बोरिवली (प.), मुंबई ४०००९१
दूरध्वनी : ०२२-२८९८१८५६
मोबाईल : ९२२३३६६६४०, ९२२३५०६९८८

✻ **उपाध्यक्ष**

**ॲड. पुरुषोत्तम गोपाळ देवधर** (कु. वृ. पान ३६०/१६९)
ब्लॉक नं. २, भागिरथी टॉवर्स, सर्व्हे नं. ६, हि. नं. ११, कोकण एक्सप्रेस हॉटेल लेन, कोथरूड, पुणे ४११०३८. ❖ मोबाईल : ९८६०३०६३४४

✻ **कार्यवाह**

**श्रीमती सरिता मुकुंद देवधर** (कु. वृ. पान नं. ३५९/१२९)
११, रामकृष्ण भुवन, गोरेगांवकर बिल्डिंग नं. ६, गिरगांव, मुंबई ४००००४.
दूरध्वनी : ०२२-२३८९३९३०
मोबाईल : ९८२०६५९४४७

✻ **सहकार्यवाह**

**सौ. पूर्वा प्रमोद देवधर** (स्वीकृत)
(कु. वृ. पान ८८२/१३२२)
११/१२ सी, दुसरा मजला, झावबा वाडी, ठाकूरद्वार, मुंबई ४००००२. मोबाईल : ९८६९९३९०७२

✻ **कोषाध्यक्ष**

**सी.ए. अकल्पिता चिंतामणी देवधर**
(कु. वृ. पान८९८/१७७८)
देवधर हाऊस, दत्त आळी, गावदेवी चौक, कल्याण (प.) ४२१३०१. मोबाईल : ९८२०३५६४१३

✻ **वाटचाल (मुद्रक, प्रकाशक)**

**श्री. आशिष राम देवधर** (कु. वृ. पान ३१/२०३६)
सी/२५, सुरांकित, सिद्धेश्वर आळी, पारनाका, कल्याण (प.) ४२१३०१. मोबाईल : ७०४५३५३६०२

✻ **सभासद**

**श्री. नारायण (दिलिप) गोविंद देवधर**
(कु.वृ. पान ४१८/१२३)
बी/१०३, आर.एन. ए. हाईट्स, जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड, अंधेरी (पू.), मुंबई ४०००९३.
दूरध्वनी : ०२२-२८२५२१४५
मोबाईल : ९८१९९७२५११

✻ **सभासद**

✻ **श्री. वासुदेव नारायण देवधर** (कु.वृ.पान ४९७/१४५) (स्वीकृत)
सी/३, १०२, सॅटेलाईट क्लासिक, रेल्वे स्टेशनजवळ, गुंफा रोड, जोगेश्वरी (पू.), मुंबई ४०००६०
दूरध्वनी : ०२२-२८२६१०२८, मो.: ९८२०१३४०८४

✻ **श्री. समीर सुरेश देवधर** (कु. वृ. पान ५८८/२२४१) (स्वीकृत)
बी/२४, कैलासधाम सोसायटी, गोपाळनगर गल्ली क्र. १, टायटन शोरूम च्या जवळ, डोंबिवली (पू.) ४२१२०१
मोबाईल : ९८३३१४८४८५

✻ **श्री. विष्णू विनायक देवधर** (स्वीकृत)
(कु.वृ.पान ४३९/१५२८)
बी-४, रूम नं. ३, सप्तर्षी सोसायटी, पांडुरंग वाडी, आनंदनगर, मानपाडा रोड, डोंबिवली (पू.) ४२१२०१
दूरध्वनी : ०२५१-२८०१८३०, मो. : ९८३३१५३९८९

✻ **कु. मीरा जगदीश देवधर** (स्वीकृत)
(कु.वृ.पान ५३४/२४०६)
स्वप्नशिल्प, फ्लॅट नं. १, पहिला मजला,
नयनतारा नर्सिंग होम शेजारी, गुलमोहर कॉलनी,
सांगली ४१६४१६. मोबाईल : ७०८३८४१४५५

✻ **श्रीमती शुभांगी सुनिल देवधर** (कु. वृ. पान ३१०) (स्वीकृत)
वैनतेय, प्लॉट नं. ३८, प्रेस्टिज पार्क, घाडगे नगर, नाशिक रोड, नाशिक ४२२१०१
दूरध्वनी : ०२५३-२४६४७८०
मोबाईल : ९८९०२४०५२२

✻ **मानद लेखा परीक्षक**

**सी.ए. किरण अनंत देवधर** (कु.वृ. पान १६२/१३७४)
१८ ई स्क्वेअर, स्टेट बँकेच्या वर, शहाजी राजे मार्ग, विलेपार्ले (पूर्व) मुंबई ४०००५७
मोबाईल : ९८२०३३५०९३

॥ श्री केशवराज प्रसन्न ॥

# देवधर मंडळ

## ❊ वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना ❊

समस्त देवधर मंडळाच्या आजीव सभासदांस,

स. न. वि. वि.

देवधर मंडळाची ४७ वी 'वार्षिक सर्वसाधारण सभा' रविवार दि. ६ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ९.३० वाजता सहकार मंदिर, नमस्कार मंडळासमोर, लाल चौकी जवळ, आग्रा रोड, कल्याण (प.) येथे आयोजित करण्यात आली आहे. देवधर मंडळाच्या सर्व आजीव सभासदांना आग्रहाची विनंती की, या सभेस आपण आवर्जून उपस्थित राहवे.

## ❊ सभेपुढील कामे ❊

१) दिवंगत कुलबंधू–भगिनींना श्रद्धांजली.

२) गतवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

३) सन २०२२–२३ मधील घडामोडींचा कार्यवाहांचा अहवाल सादर करणे.

४) सन २०२२–२३ चे लेखापरीक्षित आयव्यय पत्रक व ताळेबंद मंजूर करणे.

५) सन २०२३–२४ साठी लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.

६) सन २०२३–२४ चे अंदाजपत्रक मंजूर करणे.

७) मंडळाच्या विद्यमान घटनेमध्ये (नियम व नियमावलीमध्ये) काळानुरूप योग्य बदल करणेबाबत सभेला माहिती देणे व त्यासाठी मंजुरी देणे.

८) क्रीडा शिष्यवृत्ती व यशस्विनी पुरस्कार निधी वर्ग करणेबाबत

९) वार्षिक स्नेहसंमेलन/वर्धापनदिनाचे आयोजन सशुल्क करणे

१०) अध्यक्षांच्या परवानगीने इतर विषय

११) आभारप्रदर्शन

सरिता देवधर
कार्यवाह

दि. १५/६/२०२३

## ❊ विशेष सूचना ❊

१) या सभेचे आयोजन हे त्यावेळच्या सरकारी नियम व अटींवर अवलंबून असेल. वरील सभेच्या आयोजनात काही बदल असल्यास तो मंडळाच्या वेबसाईटवर दाखविण्यात येईल.

२) वरील सभा गणसंख्येअभावी सुरू होऊ न शकल्यास अर्धा तास थांबून, त्याच ठिकाणी सभेचे कामकाज चालविले जाईल. मात्र अशा सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

३) कोणा सभासदास हिशेब वा अन्य बाबतीत काही विचारणा अथवा सूचना करावयाच्या असतील तर त्या लिखित स्वरूपात दि. २० जुलै पर्यंत कोषाध्यक्षांकडे कराव्यात.

४) आपली उपस्थिती अगत्याची आहे. त्याची पूर्वसूचना मिळाल्यास नाष्टा व भोजनाची व्यवस्था करणे शक्य होईल.

॥ श्री केशवराज प्रसन्न ॥

# कार्यवाहांचा वार्षिक अहवाल

## (सन २०२२-२३

देवधर मंडळाचा वार्षिक अहवाल देवधर, दीक्षित, ढमढेरे कुलातील सर्व कुलबांधवांसमोर सादर करताना, मंडळाची कार्यवाह या नात्याने मला आनंद होत आहे. गेल्या वर्षी मंडळाची सेहेचाळीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ३१ जुलै २०२२ रोजी सकाळी ९.३० वाजता सहकार मंदिर सभागृह, कल्याण (प.) येथे आयोजित करण्यात आली होती. सभेला ४८ सभासद उपस्थित होते. श्रद्धांजली, अहवाल मंजुरी, लेखा परीक्षित आय-व्यय पत्रक, ताळेबंद मंजुरी, लेखापरीक्षकांची नेमणूक, अंदाजपत्रक मंजुरी या तांत्रिक बाबी पूर्ण झाल्यानंतर सभा संपली. त्यानंतर मुक्त व्यासपीठ हा कार्यक्रम प्रथमच सादर करण्यात आला. विशेषत: तरुणांचा सहभाग या कार्यक्रमात खास करून होता. एकमेकांचा परिचय होऊन तो वाढून आपापसात स्नेहभाव वृद्धिंगत व्हावा, तरुण आणि छोट्यांची उपस्थिती वाढावी हा या मागचा प्रमुख उद्देश होता. तो बऱ्याच अंशी सफल झाला. या कार्यक्रमात बारा ते पंधरा जणांनी भाग घेतला. सुमित देवधर व श्रावणी देवधर (डोंबिवली) यांनी उत्तम सूत्रसंचालन केले.

मंडळाचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. १४ व १५ मे २०२२ रोजी स्वामीकृपा हॉल, पुणे येथे संपन्न झाले. या वर्षी प्रथमच आपण हे संमेलन सशुल्क ठेवले होते. तरीही उपस्थिती चांगली होती. एकूण १७८ सभासदांनी या संमेलनाचा लाभ घेतला. माननीय अध्यक्षांनी त्याबद्दल समाधान व्यक्त केले. नेहमीप्रमाणे या वर्षीही मंडळातर्फे चार मान्यवरांना पुरस्कार देण्यात आले.

जीवनगौरव पुरस्कार श्री. नरेश दीक्षित (डोंबिवली), कै. वि. शं. देवधर स्मृति गौरव पुरस्कार आदिती देवधर (पुणे), कै. कमलाबाई केशव देवधर पुरस्कार श्री. संदीप देवधर (पुणे) शैक्षणिक कार्य, आणि चौथा सौ. नलिनी मनोहर देवधर विशेष गौरव पुरस्कार सौ. अनुराधा दीक्षित (वाडा, पडेल) यांना देण्यात आला. या संमेलनास दूरदर्शन मालिकांमध्ये काम करणारी अभिनेत्री सायली देवधर खास निमंत्रणावरून आली होती.

२०२२-२३ या वर्षात पंचवीस कुलबंधू-भगिनींना आपण अंतरलो. त्यांची नावे वाटचाल या आपल्या त्रैमासिकात वेळोवेळी देण्यात आली आहेत. दु:खितांच्या दु:खात मंडळ सहभागी आहे. त्या सर्वांना सद्‌गती लाभो अशी श्री केशवराज चरणी प्रार्थना.

मंडळाची आर्थिक बाजू बळकट व्हावी म्हणून आपण एक संकल्पना कार्यान्वित केली आहे. प्रत्येक सभासदाने मंडळाला दरवर्षी संवर्धन निधी म्हणून रुपये तीनशे द्यावेत. त्यास अजून म्हणावा तसा प्रतिसाद मिळालेला नाही. गेल्या वर्षभरात फक्त ११० सभासदांनी संवर्धन शुल्क भरले आहे. सर्वांनी कळकळीची विनंती

आहे की, प्रत्येकाने दरवर्षी रु. ३००/- संवर्धन निधी म्हणून (एक व्रत घेतले आहे असे समजून) मंडळाकडे जमा करावेत.

या वर्षात कार्यकारिणीच्या एकूण आठ सभा झाल्या. त्यापैकी दोन सभा प्रत्यक्ष होऊन, बाकीच्या ऑनलाईन घेण्यात आल्या. संमेलनासाठी म्हणून काही खास सभा घेतल्या.

या वर्षातील आणखी एक खास नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे, आपले एक ज्येष्ठ कुलबंधू पुण्याचे माननीय सदाशिवराव देवधर यांची माननीय पंतप्रधानांबरोबर झालेली भेट. त्यांच्या बोलण्यातून मा. पंतप्रधानांबद्दल नितांत आदर व्यक्त होत होता. कोणताही वैयक्तिक स्वार्थ त्यात नव्हता.

या निमित्ताने सदाशिवरावांची काही कुलसदस्यांनी भेट घेतली. त्यांच्याशी भेट म्हणजे अखंड भारताचं चिंतन. शुभांगी देवधर (नाशिक) यांनी गप्पांच्या माध्यमातून ही मुलाखत घेतली. हा गप्पांचा कार्यक्रम छानच झाला. या कार्यक्रमाचे प्रसारण ऑनलाईन करण्यात आले. प्रत्यक्ष कार्यक्रमाला पंचेचाळीस सभासद होते. तर ऑनलाईन कार्यक्रमाचा तीस ते पस्तीस जणांनी लाभ घेतला.

अजून एक उल्लेखनीय बाब म्हणजे मागे चिपळूण येथील पूरपरिस्थितीतीमुळे अडचणीत सापडलेल्या कांचन देवधर यांना मंडळाने रुपये वीस हजार एवढी आर्थिक मदत केली होती. त्यांनी नुकतीच ती मदत परत केली आहे.

या वर्षी २३ नवीन सभासद झाले आहेत.देणग्यांच्या स्वरूपात जवळजवळ चार लाख सत्तर हजार रुपये मिळाले आहेत. सर्व देणगीदारांचे मंडळाकडून आभार.

यंदा आपण तीन विद्यार्थ्यांना रुपये वीस हजार शैक्षणिक साहाय्य केले आहे.

आपण दरवर्षी संमेलनाचे निमित्ताने एक स्मरणिका प्रकाशित करतो. या वर्षी युवा प्रेरणा या नावाची स्मरणिका काढली. बऱ्याच युवक-युवतींनी लेखांमधून आपले विचार व अनुभव मांडले. सर्वांना धन्यवाद!

मंडळाला वेळोवेळी अर्थसाहाय्य करणारे उदार मनाचे देणगीदार, जाहिरातदार, हितचिंतक या सर्वांचे मंडळ आभारी आहे.

- **सरिता मुकुंद देवधर**, गिरगांव
(कार्यवाह)

***

संपादकीय पान ३ वरून

जर प्रत्यक्ष घेणे शक्य नसेल तर आपण गुगल मीट किंवा झूमच्या माध्यमातून घेऊ शकतो.

या वर्षीची वार्षिक सभा कल्याणमध्ये दि. ६ ऑगस्ट रोजी आयोजित केली आहे.

त्याविषयीची सूचना, तपशील अंकात इतरत्र दिला आहे. या सभेला जास्तीत जास्त सभासदांनी उपस्थित राहावे ही विनंती. प्रत्यक्ष भेटीचा आनंद मिळेल. तसेच मंडळाची वाटचाल उत्तरोत्तर प्रगतीपथावर नेण्यासाठी आपल्या मौल्यवान सूचनांचाही विचार करता येईल.

***

# देवधर मंडळ
# सांगली स्नेहमेळावा -इतिवृत्त

- **सरिता मुकुंद देवधर**, गिरगांव
(कार्यवाह)

देवधर दीक्षित ढमढेरे कौशिक गोत्री कुलबांधवांचे स्नेहसंमेलन सांगली शहरातील हरिदास भवन येथे, शनिवार ६ मे २०२३ आणि रविवार ७ मे २०२३ असे दोन दिवस अत्यंत आनंदी आणि उत्साही वातावरणात संपन्न झाले. या संमेलनासाठी मुंबई, ठाणे, डोंबिवली, कल्याण पुणे, नाशिक या शहरातून आपले कुलबांधव आले होते. पहिल्या दिवशी उपस्थिती ७२ होती देवधरांच्या माहेरवाशिणी आणि आप्तेष्टही या संमेलनास आले होते.

शनिवारी संध्याकाळी चार वाजल्यापासूनच हळूहळू मंडळी हॉलमध्ये जमू लागले. दारातील छोटीशी रांगोळी सर्वांचं स्वागत करीत होती. चहा-कॉफी आणि बिस्किटांची व्यवस्था करण्यात आली होती. कार्यकर्ते सर्वांचं मनापासून स्वागत करत होते. बरोबर सव्वापाच वाजता मनोरंजनाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. या संपूर्ण कार्यक्रमाची जबाबदारी आणि नेतृत्व जिने केले, ती शुभांगी सुनील देवधर (नाशिक) सुरुवातीला थोडी साशंक होती. गेले तीन-चार महिने आपल्या विविध व्हॉट्स ॲप ग्रुपवर या कार्यक्रमाविषयी आवाहन करूनही फारच अल्प प्रतिसाद मिळाला होता. चित्र फारच धुसर होते. प्रत्यक्ष सहा मे रोजी उत्तम प्रतिसाद मिळाला. उत्स्फूर्तपणे सादरीकरणाची प्रत्येकाने तयारी दाखवली व त्यामुळे कार्यक्रम रंगला.

'आठवणीतल्या कविता' ही कार्यक्रमाची प्रमुख संकल्पना होती. आपल्या देवधर दीक्षित ढमढेरे कुलंबधुभगिनींनी वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्या यशाचा ठसा उमटविला आहे त्यांचे मनोगत आणि अनुभव कथन असेही नियोजन होतं. त्यामुळे कविता आणि प्रतिथयश लोकांची मनोगते असा सुंदर कार्यक्रम झाला.

पुण्याच्या गोपाळ देवधर यांनी रामायणातली 'दशरथा घे हे पायसदान' आणि 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा' ही दोन गीते अतिशय सुरेल आणि गोड आवाजात सादर केली. या वयातल्या त्यांच्या उत्साहाला सलाम. अनिता लागू या सांगलीच्या एका माहेरवाशीणीने 'जिवंत असण्याचा दाखला' अशी एक सुंदर कथा सांगितली. मुलुंडच्या मनोहर काकांनी सुद्धा एक कविता सादर केली.

शुभा देवधर, पुणे आणि त्यांच्या भगिनी यांनी राधाकृष्णवरचं एक भजन अतिशय भक्तिभावाने आणि सुरेलपणे सादर केले. आपला एक छोटा कलाकार चिन्मय दीक्षित याने

गणपतीचं एक गीत सादर केलं. आठवणीतल्या कवितांमध्ये अनेक कवितांचे सादरीकरण झाले. डॉ. सुगंधा सुरेश (बोरिवली) यांनी 'या बाळांनो या रे या' ही भा. रा. तांबे यांची कविता सादर करून सर्वांना आपल्या बालपणीच्या आठवणीत नेले. त्यांनी स्वतः लिहिलेली विठोबावरची कविता म्हणून दाखवली.

दिनांक ७ मे च्या आपल्या प्रमुख कार्यक्रमाचे पाहुणे अध्यक्ष श्री. विनायक देवधर (ठाणे) यांच्या सौभाग्यवती सौ. शुभांगी देवधर यांनी 'अजाण आम्ही तुझी लेकरे तू सर्वांचा पिता प्रेमाने तुझं नमितो गातो तुझ्या गुणांच्या कथा' ही कविता अतिशय सुंदरपणे सादर केली. शुभांगी देवधर (नाशिक) यांनीही इंदिरा संत यांची 'रंगरंगुल्या सानसानुल्या गवतफुला रे गवतफुला' ही कविता आणि बालकवींची 'श्रावणमासी हर्ष मानसी' ही कविता सादर केली. मंडळाच्या सहकार्यवाह सौ. पूर्वा देवधर यांनी एक विडंबन कविता सादर केली. 'उठ माझ्या नंदलाला' या गाण्याचे ते विडंबन होतं. मंजुषा देवधर (मुलुंड) यांनी 'दिवस तुझे हे फुलायचे' या गाण्यावरची विडंबन कविता सादर केली. यश देवधर (नाशिक) यांनी 'मी कुठे म्हणतो मला परी हवी, पण जरा बरी हवी' ही मंगेश पाडगावकर यांची कविता सादर केली. आपले एक ज्येष्ठ सभासद डोंबिवलीचे नरेश दीक्षित यांचा नातू चि. कौशिक केदार दीक्षित याने एक गणपतीचे गीत सादर केले. 'सांगलीचा गणपती आहे सोन्याचा अंगावरी शेला आहे भरजरीचा' हे सांगलीत येऊन सांगलीच्या गणपतीचे वर्णन करणारे गाणे विशेष नमूद करण्यासारखे आणि औचित्यपूर्ण ठरले.

त्यानंतर आपल्याच काही बांधवांनी आपल्या व्यवसायाबद्दल माहिती दिली. ओंकार देवधर (ठाणे) यांनी ठाणे तसेच कल्याण डोंबिवली येथे प्रसिद्ध असलेल्या स्वत:च्या देवधर क्लासेसचा सुरुवातीपासूनचा आलेख मांडला. त्यांच्या पत्नी सौ. सोनाली देवधर यांनीही मनोगत व्यक्त केले. पुण्याच्या आदित्य देवधर यांनी, ते स्वतः औषध बनवण्याच्या व्यवसायात कसे आले आणि आज ते एक यशस्वी व्यावसायिक कसे झाले आहेत, त्याबद्दल आपलं मनोगत व्यक्त केले. सौ. सुवर्णरेखा देवधर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. वापरून झालेल्या आपल्या घरातल्या जरीच्या साड्यांचा योग्य उपयोग करून अनेक शोभिवंत विविध वस्तू कशा बनविता येतात हे सांगितले. त्याचा उपयोग घरातल्या घरात कसा करता येतो हे सांगितलं. त्यांनी यातून उद्योग सुरू करून त्यात उत्तम यश मिळवलेले आहे. त्यांनी ब्रह्मदेवावर पीएचडी केली आहे. त्या संदर्भातही त्यांनी आपले विचार मांडले. बेळगावची कु. सायली देवधर ही अतिशय तरुण कीर्तनकार आहे. 'नारदीय कीर्तन' हे स्वतःचे प्रोफेशन म्हणून स्वीकारून एक वेगळी वाट तिने निवडली आहे. त्याबद्दलचे तिने तिचे मनोगत व्यक्त केलं. जान्हवी देवधर (पुणे) या गीता धर्म मंडळाचे काम करतात. भगवद्गीतेचे १८ अध्याय यांचे पाठ आहेत आणि शृंगेरी मठातर्फे त्यांचा सत्कारही

झाला आहे. त्या स्वतः गीता शिकवण्याचे काम करतात. भगवद्गीता शिकणं हे प्रत्येक भारतीयासाठी कसं महत्त्वपूर्ण आहे आणि लहानपणी संथा घेतली तर उच्चार सुस्पष्ट कसे होतात याबद्दल त्यांनी माहिती दिली. सौ. स्वाती देवधर (ठाणे) या स्वतः पौरोहित्य शिकल्या असून त्याचे वर्गही त्या घेतात. त्यांचा एक अनोखा अनुभव त्यांनी सांगितला. त्यांनी एक अहिरणी गीत सादर केलं. सौ. मंजिरी देवधर (डोंबिवली) यांनी एक सुंदर किस्सा सांगितला. अत्यंत प्रेमाने तिच्या यजमानांनी दिलेलं गिफ्ट तिच्या हातून हरवलं होतं आणि ते परत कसं मिळालं याचा एक चटकदार खुसखुशीत अनुभव सांगून सर्वांना हसवलं. कार्यक्रमाला 'चार चाँद' लागावेत अशी 'सर्वात्मका सर्वेश्वरा ही भैरवी डोंबिवलीच्या अविनाश देवधर यांनी सादर केली.

या सर्वांच्या भरीव आणि उत्साहपूर्ण योगदानामुळे कार्यक्रम अपेक्षेपेक्षा उत्तम झाला. संमेलनपूर्व संध्याकाळ अतिशय रम्य झाली. सर्वांनी रुचकर जेवणाचा आस्वाद घेतला. ६ तारखेच्या संध्याकाळची सांगता रात्री दहा वाजता झाली.

रविवार, दि. ७ मे २०२३. संमेलनाचा दुसरा दिवस. हरिदास भवनाच्या हॉलमध्ये एखाद्या मंगल सोहळ्याचे रूप आले होते. सगळीकडे आनंदी आणि उत्साही वातावरण होते. सनईच्या मंगल सुरात सर्वांचं स्वागत होत होते. कुलबांधवांची भेट बऱ्याच दिवसांनी झाल्यामुळे प्रत्येकाच्या चेहऱ्यावरचा आनंद खास होता. रजिस्ट्रेशन केल्यानंतर प्रत्येकाला नाश्ता आणि जेवणाचे कुपन देण्याचे काम मंडळाचे कार्यकर्ते अगदी हसतमुखाने करीत होते. अत्तराने सुगंधित करून प्रत्येकाला पेढा देऊन सर्वांचं गोड स्वागत झाले. आपले एक जुने सभासद श्री. दिनकर देवधर यांच्यातर्फे प्रत्येकाला एक मनुकाचे पाकिट भेट देण्यात आले. जणू काही सर्वांच्या आरोग्याची काळजी त्यांनी घेतली असं वाटलं.

चहा आणि चविष्ट उपम्याचा आस्वाद घेऊन सर्व मंडळी हॉलमध्ये जमली. बरोबर पावणेदहाला मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. संपूर्ण कार्यक्रम एफबी लाईव्ह ठेवण्यात आला होता. त्यामुळे सांगलीच्या बाहेरील विविध शहरातील आपल्या कुलबांधवांना अगदी परदेशस्थ बांधवांनाही हा कार्यक्रम बघणे शक्य झाले. कल्याणच्या आशुतोष देवधर याने त्यासाठी विशेष प्रयत्न केले.

मंडळाच्या कार्यवाह सरिता देवधर यांनी श्री गजाननाचे आणि श्री केशवराजाचे स्मरण करून सर्वांचं मनःपूर्वक स्वागत केलं. मंडळाचे अध्यक्ष श्री. सुरेश देवधर यांनी प्रमुख पाहुणे माननीय श्री. विनायक देवधर आणि त्यांच्या सौभाग्यवती सौ. शुभांगी यांचे स्वागत केले आणि त्यांना आसनस्थ होण्याची विनंती केली. मंडळाचे पदाधिकारी, अध्यक्ष, उपाध्यक्ष श्री. पी. जी. देवधर आणि प्रमुख पाहुण्यांनी दीपप्रज्वलन करून केशवराजाचे पूजन केले. सर्वांनी उभे राहून केशवराजाची आरती म्हटली. सौ. स्वाती देवधर (ठाणे) यांनी ईशस्तवन गायलं

आणि आशीर्वादापर शांतीमंत्राचे पठण केलं. श्री. दिनकर देवधर (मुलुंड) यांनी विठ्ठलाची आरती म्हटली. कार्यवाहांनी संमेलनातील कार्यक्रमाची रूपरेषा थोडक्यात सांगितली. ''आधुनिक तंत्रज्ञानाच्या आहारी न जाता त्याचा आवश्यक तेवढाच उपयोग करा. आपले नातेसंबंध सोडू नका. शक्य तेव्हा एकमेकांना भेटा आणि दुःख वाटून घ्या.. आनंद द्विगुणीत करा आणि आपलं जगणं समृद्ध आणि आनंदी करा'' असं आवर्जून सांगितलं.

सर्व सन्मानित व्यक्ती व्यासपीठावर स्थानापन्न झाल्यावर मंडळाच्या सहकार्यवाह सौ. पूर्वा देवधर यांनी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री. विनायक नरहर देवधर यांचा परिचय करून दिला. अध्यक्षांनी शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचं यथोचित स्वागत केलं. डॉ. सुगंधा देवधर यांनी आजच्या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथींच्या पत्नी सौ शुभांगी देवधर यांची साडीचोळीने ओटी भरून त्यांचे स्वागत केलं.

आता होणार होता स्मरणिका प्रकाशन समारंभ. तत्पूर्वी स्मरणिकेचे संपादक श्री. आशिष देवधर (कल्याण) यांनी आपले अनुभव आणि मनोगत व्यक्त केलं. संपादन कार्यात मदत करणाऱ्या अकल्पिता, पूर्वा तसेच विष्णू आणि समीर या सर्वांचा खास उल्लेख करून त्यांना धन्यवाद दिले. त्यानंतर स्नेहसंमेलनानिमित्त तयार केलेल्या 'सफर देश-विदेशाची' या स्मरणिकेचे सर्व मान्यवर आणि प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रकाशन झाले. 'सफर देश- विदेशाची' हे आगळवेगळे आणि औचित्यपूर्ण नाव सौ अकल्पिता आशिष (कल्याण) यांच्या कल्पनेतून साकारले आहे.

आता पुरस्कार वितरणाचा प्रमुख कार्यक्रम सुरू झाला. मंडळाचा जीवनगौरव पुरस्कार श्री. अविनाश दिवाकर देवधर डोंबिवली यांना देण्यात आला.

नलिनी मनोहर देवधर चतुरस्त्र व्यक्तिमत्व पुरस्कार डॉ. काशिनाथ दामोदर देवधर (पुणे) यांना देण्यात आला.

कै. वि. शं. देवधर स्मृती गौरव पुरस्कार श्री. जगदीश माधव देवधर (सांगली) यांना देण्यात आला.

कै. कमलाबाई केशव देवधर स्मृती गौरव पुरस्कार हा डॉ. प्राजक्ता अविनाश देवधर डोंबिवली यांना देण्यात आला.

सर्व मानपत्रांचे वाचन सौ. मंजिरी समीर देवधर (डोंबिवली) आणि सौ. वृषाली विष्णू देवधर (डोंबिवली) या दोघींनी केलं. पुरस्कार प्राप्त सर्व सन्मानित व्यक्तिंनी थोडक्यात आपलं मनोगत व्यक्त करून मंडळाचे आभार मानले. विशेषत: डॉ. काशिनाथ देवधर यांनी कारगिल युद्धाच्या वेळी हलक्या वजनाच्या शस्त्रांसदर्भात भारतीय लष्कराबरोबर केलेले काम आणि मुख्यत: त्या निमित्ताने तत्कालिन राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांचे लाभलेले सानिध्य या विषयीचे अनुभव कथन केले.

त्यानंतर अमृत महोत्सवी सत्कार वयाची ७५ वर्षे पूर्ण आणि विवाहास पन्नास वर्षे पूर्ण

झालेल्या दांपत्यांचे सन्मान करण्यात आले.

वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल मंडळाचे अध्यक्ष श्री. सुरेश देवधर यांचा सत्कार करण्यात आला. सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. त्यांनी आपलं मनोगत थोडक्यात सांगितलं. सौ. वसुंधरा आणि प्रमोद देवधर (गोरेगाव) यांच्या विवाहास पन्नास वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यांना भेट वस्तू आणि पुष्पगुच्छ शुभेच्छा पत्र देण्यात आले. त्या दोघांनीही आपलं मनोगत थोडक्यात व्यक्त केलं. यानंतर उपस्थित असलेल्या हर्ष दातार (माहेरवाशिणीचा मुलगा) या विद्यार्थ्यांचं कौतुक करण्यात आलं. दि. ७ मे हा जागतिक मैदानी खेळाडू दिवस असल्याने आपल्या कुलबांधवांपैकी जे खेळाडू आहेत त्यांची नावे पूर्वा देवधर यांनी वाचून दाखवली आणि त्यांचे कौतुक केले.

आजच्या कार्यक्रमास आपले एकूण ८० कुलबांधव उपस्थित होते. यापैकी वयाने सर्वात लहान असलेल्या चि. कौशिक केदार दीक्षित याच्या हस्ते लकी ड्रॉ नंबर काढण्यात आले. त्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

सुधीर देवधर (ठाणे), भाग्यश्री देवधर (सांगली) आणि आनंद देवधर (गिरगाव) हे तीन भाग्यवान विजेते ठरले.

श्री. गजानन शंकर देवधर (ठाणे) यांनी मंडळास रुपये दहा हजारांची देणगी दिली.

दिनांक ६ मे च्या कार्यक्रमात भाग घेतलेल्या सर्वांचे अध्यक्षांच्या हस्ते पुष्प देऊन कौतुक करण्यात आले. सांगलीतील स्थानिक आणि इतर सदस्यांचा सत्कार करण्यात आला. सांगलीतील देवधर मंडळाची कार्यकारिणी सदस्या मीरा जगदिश देवधर आणि तिचे वडील श्री. जगदिश यांनी संमेलनासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांचा खास नामोल्लेख करून कौतुक करण्यात आले.

प्रमुख पाहुण्यांनी आपलं मनोगत व्यक्त करून मंडळाला एक लाख रुपयांची भरघोस देणगी दिली. ''मंडळातील तरुणांनी आणि उद्योजकांनी यात सहभागी व्हावे, संमेलनाचा कार्यक्रम थोडा बदलून पाहवा'' असा विचार व्यक्त केला. त्यानंतर मंडळाच्या अध्यक्षांनी आपलं मनोगत व्यक्त करून सर्वांना शुभेच्छा दिल्या. मंडळाचे उपाध्यक्ष पीजी देवधर यांनी सर्वांचे आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. आम्रखंड पुरीच्या स्वादिष्ट भोजनाचा सर्वांनी आस्वाद घेतला. पुढच्या वर्षी पुन्हा भेटण्याचे एकमेकांना सांगून सर्वांनी निरोप घेतला. आणि संमेलनाची सुफळ सांगता झाली.

***

# सदिच्छा भेट
# IPS अश्विनी देवधर सानप यांच्याशी

देवधर मंडळाच्या कार्यकारिणीतील सदस्य श्री. समीर देवधर, अकल्पिता देवधर व सौ. पूर्वा देवधर हे सौ. अश्विनी सानप (IPS), पोलीस अधीक्षक (प्रशासन) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, कफ परेड, मुंबई यांच्या निवासस्थानी, सदिच्छा भेट घेण्यास नुकतेच गेले होते.



आपल्या कुळातील यशस्वी आणि गुणीजनांचा आपल्या सर्वांना परिचय व्हावा हा ही हेतू या भेटी मागे होता.

पोलीस खात्यात एवढ्या मोठ्या हुद्द्यावर आपली एक कुलभगिनी कार्यरत आहे अशी माहिती समीर देवधर याला कळली. मग त्याने माहिती काढून त्यांच्याशी संपर्क साधला.

गेल्या महिन्यात मंडळाचे संमेलन संपन्न झाले. त्या निमित्ताने प्रकाशित केलेल्या स्मरणिकेत त्यांनी आपली शुभेच्छा जाहिरात दिली होती. आजची सदिच्छा भेट ही सदर स्मरणिका त्यांना देण्याच्या निमित्ताने होती.

सौ. अश्विनी यांचे माहेरचे नाव ज्ञानदा विद्यानंद देवधर. त्यांचे आई-वडील मूळचे देवधर वाडी, दापोली, जिल्हा रत्नागिरी येथील आहेत. त्यांचे वडील श्री. विद्यानंद घनश्याम देवधर (वेळंब घराणे) भारतीय सैन्यात होते. तिथून निवृत्त झाल्यावर पुढे पुण्यात स्थायिक झाले आहेत. सौ. अश्विनी यांची बहीण पुण्यात राहते आणि भाऊ परदेशात स्थायिक आहे.

त्यांचे यजमान श्री. संतोष GST विभागात डेप्युटी कमिशनर म्हणून कार्यरत आहेत. मोठा मुलगा या वर्षी ९१% गुण मिळवून इ. १० वी उत्तीर्ण झाला. त्याला चार्टर्ड अकाउंटंट व्हायचे आहे आणि मुलगी इ. ८ वीत शिकत आहे.

आजच्या पहिल्याच प्रत्यक्ष भेटीत, औपचारिकता दूर होऊन छान गप्पा-टप्पा झाल्या. आमरस, पुरणपोळी इ. सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतला. श्री. संतोष आणि सौ. सानप यांनी अगदी आग्रहाने आदरातिथ्य केले.

गप्पा मारता मारता त्यांनी आपल्या देवधर मंडळाच्या कार्याबद्दल उत्सुकता दाखवली. आम्ही त्यांना वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेहसंमेलनं, आनंद मेळावे, देवदर्शन आणि सहली, आपलं देवधर कट्टा युट्युब चॅनेल, इत्यादी विषयी माहिती सांगितली.

मंडळाच्या उपक्रमांमध्ये व्यस्त कामातून शक्य झाल्यास नक्की यायचा प्रयत्न करू असं आश्वासन उभयतांनी दिलं आहे. त्यांच्या माध्यमातून आपल्या कुळातील तरुण बंधू-भगिनींना अधिक मौलिक मार्गदर्शन होईल याची खात्री आहे.

**- सौ. पूर्वा देवधर**
देवधर मंडळ सहकार्यवाह

# देवधर मंडळ

## * ३१ मार्च २०२३ अखेर ताळेबंद *

| गतवर्षी | निधी | परि क्र. | रक्कम रुपये | गतवर्षी | मिळकत | परि क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४,३०,७९१ | कायम निधी | | | ५,०८६ | रोख | | २,४१७ |
| | शिल्लक ४,३०,७९१ | | | | | | |
| | + आजीव २३,००० | १ | ४,५३,७९१ | २,२६,७५५ | बँक शिल्लक | ६ | २,७८,५४० |
| १२,८७,६४० | शिक्षण निधी | | | | | | |
| | शिल्लक १२,८७,६४० | | | ३४,८९,४०९ | बँक ठेवी | ७ | ४०,५१,१७२ |
| | + देणगी ३,४०,०२४ | २ | १६,२७,६६४ | | | | |
| ३,७३,६०२ | वाटचाल निधी | | | | | | |
| | शिल्लक ३,७३,६०२ | | | | | | |
| | + देणगी ८६,३५३ | ३ | ४,५९,९५५ | | | | |
| १,११,०३२ | श्री केशवराज देवस्थान | | | | | | |
| | शिल्लक १,११,०३२ | | | | | | |
| | + वास्तूप्रकल्प निधी २,१४,५०५ | | ३,२५,५३७ | | | | |
| ३०,८०४ | कुलवृत्तांत/सीडी/वेबप्रकल्प | | ३०,८०४ | | | | |
| १,०४,००० | क्रीडा शिष्यवृत्ती निधी | | १,०४,००० | | | | |
| २,१४,५०५ | वास्तुप्रकल्प निधी | | ०० | | | | |
| १,००,००० | वि. शं. देवधर गौरव पुरस्कार निधी | | १,००,००० | | | | |
| १,००,००० | कै. कमलाबाई देवधर स्मृति पुरस्कार निधी | | १,००,००० | | | | |
| १,००,००० | यशस्विनी स्मृति पुरस्कार निधी | | १,००,००० | | | | |
| १,००,००० | शैक्षणिक स्कॉलरशिप निधी (नलिनी देवधर गौरव पुरस्कार) | | १,००,००० | | | | |
| ५,२६,११९ | आरोग्य निधी | | | | | | |
| | शिल्लक ५,२६,११९ | | | | | | |
| | + देणगी/परतावा २०,००० | ४ | ५,४६,११९ | | | | |
| ७९,६०१ | आपत्ती निवारण निधी | | | | | | |
| | शिल्लक ७९,६०१ | | | | | | |
| | – मदत १५,००० | ५ | ६४,६०१ | | | | |
| ६४,०५० | संमेलन निधी | | | | | | |
| | संमेलन शुल्क ९,७५० | | | | | | |
| | संमेलन देणगी १२,५०१ | | २२,२५१ | | | | |

# देवधर मंडळ

## ✲ ३१ मार्च २०२३ अखेर ताळेबंद ✲

| गतवर्षी | निधी | परि क्र. | रक्कम रुपये | गतवर्षी | मिळकत | परि क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ९९,१०६ | सर्वसाधारण निधी<br>शिल्लक ९९,१०६<br>+ अधिशेष १,९८,३०१<br>(surplus) | | २,९७,४०७ | | | | |
| ३७,२१,२५० | एकूण | | ४३,३२,१२९ | ३७,२१,२५० | एकूण | | ४३,३२,१२९ |

सर्व हिशोब कॅशबेसिसवर आहेत.

| सही | सही | सही | सही |
|---|---|---|---|
| सुरेश वि. देवधर | सरिता देवधर | अकल्पिता देवधर | किरण देवधर |
| अध्यक्ष | कार्यवाह | कोषाधिकारी | लेखापरीक्षक |

# देवधर मंडळ

## ✲ अंदाजपत्रक सन २०२३-२४ ✲

| जमा | रक्कम | खर्च | रक्कम |
|---|---|---|---|
| मुदत ठेवींवरील व्याज | २,६०,०००.०० | शैक्षणिक मदत | १,००,०००.०० |
| बचत खात्यांवरील व्याज | १०,०००.०० | वैद्यकीय मदत | ५०,०००.०० |
| संमेलन/मेळावे देणगी | १,००,०००.०० | वार्षिक सभा खर्च | ५०,०००.०० |
| स्मरणिका देणगी | १,१२,५००.०० | स्मरणिका खर्च | ८०,०००.०० |
| संवर्धन देणगी | ५०,०००.०० | संमेलन/मेळावा खर्च | १,५०,०००.०० |
| इतर देणगी (शिक्षण/वाढदिवस/आरोग्य इ.) | ५०,०००.०० | वाटचाल खर्च | १,००,०००.०० |
| | | इतर खर्च | ५०,०००.०० |
| | | अधिशेष | २,५००.०० |
| एकूण | ५,८२,५००.०० | एकूण | ५,८२,५००.०० |

# देवधर मंडळ

## * ३१ मार्च २०२३ अखेरचे वार्षिक आय-व्यय पत्रक *

| गतवर्षी | खर्च | परि क्र. | रक्कम रुपये | गतवर्षी | उत्पन्न | परि क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३५ | बँक चार्जेस | | १८३ | | व्याज | | |
| १,९०० | छपाई / स्टेशनरी | | ३०० | १,२५,४५० | बँक ठेवी | ८ | २,८५,६५१ |
| २,००० | कमिटी मिटिंग खर्च | | ०० | ६,२८५ | सेव्हिंग बँक | ९ | १०,८६७ |
| ३७७ | पोस्टेज कुरिअर | | ०० | ०० | सभा/संमेलन आणि स्मरणिका देणगी | १० | १,४८,८०० |
| ३२,००० | वार्षिक सभा खर्च | | ३६,२५० | | | | |
| ०० | संमेलन स्मरणिका खर्च | | २,४३,११८ | १,००० | वाटचाल छपाई देणगी | | ०० |
| १,१०,००० | शैक्षणिक मदत | १२ | २०,००० | | | | |
| ७८,२२७ | वाटचाल खर्च | | ८९,३६७ | १५,००० | संवर्धन देणगी | | ३३,१०० |
| ९,००० | वेबसाईट खर्च | | ०० | १८,००१ | वाढदिवस देणगी | ११ | १०,६०१ |
| | | | | ०० | संमेलन शुल्क | | १,१३,५०० |
| १५,००० | वैद्यकीय मदत | १३ | १५,००० | ८२,८०३ | वित्तीय तूट | | ०० |
| ०० | अधिशेष (surplus) | | १,९८,३०१ | | | | |
| २,४८,५३९ | एकूण | | ६,०२,५१९ | २,४८,५३९ | एकूण | | ६,०२,५१९ |

विशेष टीप : दि. ३१ मार्च २०२३ पर्यंत मंडळाच्या सभासदांकडून कोषाधिकाऱ्यांकडे परत आलेल्या पावतीपुस्तकांवरून सर्व हिशोब तयार करण्यात आले आहेत.

वरील हिशोब कॅशबेसिस वर आहेत.

| सही | सही | सही | सही |
|---|---|---|---|
| सुरेश वि. देवधर | सरिता देवधर | अकल्पिता देवधर | किरण देवधर |
| अध्यक्ष | कार्यवाह | कोषाधिकारी | लेखापरीक्षक |

## परिशिष्ठ – १

### आजीव सभासद

| | | |
|---|---|---|
| २७६४ | अनिल केशव देवधर, पुणे | १०००/- |
| २७६५ | शुभा अनिल देवधर, पुणे | १०००/- |
| २७६६ | अनिल माधव देवधर, पुणे | १०००/- |
| २७६७ | सुरभी देवधर-गाडगीळ, कांदिवली | १०००/- |
| २७६८ | मेघना मनोहर जांभेकर, गिरगाव | १०००/- |
| २७६९ | अनुजा देवधर, कल्याण | १०००/- |
| २७७० | रुचिता रविचंद्र देवधर | १०००/- |
| २७७१ | आनंद दत्तात्रय देवधर, पुणे | १०००/- |
| २७७२ | प्राची पांडुरंग मुळवे, मुंबई | १०००/- |
| २७७३ | अमिता अरुण कुटुंबे, मुंबई | १०००/- |
| २७७४ | ज्योती नितीन गाडगीळ, मुंबई | १०००/- |
| २७७५ | सुमेध श्रीधर दीक्षित, देवगड | १०००/- |
| २७७६ | सुमुख श्रीधर दीक्षित, देवगड | १०००/- |
| २७७७ | सोनाली ओंकार देवधर, ठाणे | १०००/- |
| २७७८ | केदार शिवराम देवधर, पेण | १०००/- |
| २७७९ | निशा केदार देवधर, पेण | १०००/- |
| २७८० | वेदिका प्रथमेश देवधर, डोंबिवली | १०००/- |
| २७८१ | सुमेध अरुण देवधर, पुणे | १०००/- |
| २७८२ | प्राजक्ता सुमेध देवधर, पुणे | १०००/- |
| २७८३ | अमित प्रकाश देवधर, पुणे | १०००/- |
| २७८४ | रुपाली अमित देवधर, पुणे | १०००/- |
| २७८५ | धनंजय हरिभाऊ देवधर, पुणे | १०००/- |
| २७८६ | आदित्य अभिजित देवधर, सोलापूर | १०००/- |

एकूण नवीन २३ सभासद

| | |
|---|---|
| एकूण रुपये | रु. २३,०००/- |

## परिशिष्ठ – ३

### वाटचाल निधी

| | |
|---|---|
| सुरेश विश्वनाथ देवधर, बोरिवली | ५०,००० |
| आशुतोष चिंतामणी देवधर, कल्याण | १०,००० |
| अश्विनी करंदीकर, मुंबई | १,५०० |
| माधवी ढमढेरे, पुणे | १,००० |
| रेखा देवधर-गोखले, कोल्हापूर | १,५०० |
| सरिता अरुण देवधर, पुणे | १,००० |
| प्रकाश केशव ढमढेरे, पुणे | १,००० |
| अविनाश देवधर, डोंबिवली | १,००० |
| स्नेहा प्रकाश दीक्षित, डोंबिवली | २,००० |
| श्रीराम देवधर, कल्याण | ७०१ |
| अक्षय राजाराम देवधर, वडोदरा | १,५०० |
| नरेश कृष्णाजी दीक्षित, डोंबिवली | ५,००० |
| नितीन देवधर, वडोदरा | ५,००१ |
| श्वेता देवधर-भातखंडे, नवीन पनवेल | ५,००१ |
| अनुजा देवधर, कल्याण | १५० |
| एकूण | ८६,३५३ |

## परिशिष्ठ ४

### आरोग्य निधी – देणगी

| | |
|---|---|
| सुप्रिया पराडकर, डोंबिवली (परतावा) | १०,००० |
| शुभांगी सुनील देवधर, नाशिक<br>(कै. डॉ. सुनील गो. देवधर यांच्या स्मृत्यर्थ) | १०,००० |
| एकूण | २०,००० |

## परिशिष्ठ ५

### आपत्ती निवारण निधी – मदत

| | |
|---|---|
| अमोघ / सुनिता देवधर, सातारा | १५,००० |
| एकूण | १५,००० |

## परिशिष्ठ – २

### शिक्षण निधी

| | |
|---|---|
| अश्विनी करंदीकर, मुंबई | ५०० |
| रेखा देवधर-गोखले, कोल्हापूर | १,५०० |
| मानसी / सोनल ओगले (परतावा), पुणे | ५,००० |
| शिरीष कांत देवधर, नाशिक | |
| (डॉ. शंकर व सुमित्रा शंकर स्मरणार्थ) | १,००० |
| (जयंत व शरयू जयंत स्मरणार्थ) | १,००० |
| सुरभी विनायक देवधर, ठाणे | ५,००१ |
| (विष्णू बालाजी देवधर स्मृत्यर्थ) | |
| केदार देवधर, मालाड | १,००० |
| राजेंद्र देवधर, पुणे | २०,००० |
| अनुजा देवधर, कल्याण | ५११ |
| प्रभाकर देवधर, विजयदूर्ग | १,१०० |
| संजय लक्ष्मण देवधर, पुणे | २,००० |
| सीमा/अनिरुद्ध देवधर, ठाणे | ११,००० |
| महेश हरिभाऊ देवधर, ठाणे | २५,००० |
| अनुपमा देवधर, ठाणे | ५,००० |
| ऋषीकेश विनायक देवधर, ठाणे | २५,००० |
| मिलिंद देवधर, पिंपरी | ५,००० |
| विनायक नरहर देवधर, ठाणे | २५,००० |
| पुष्कर जयंत देवधर, ठाणे | ५,१११ |
| श्रीश किरण देवधर, नागपूर | ११,००० |
| पु. गो. देवधर, पुणे | १०,००० |
| मीना दत्तात्रय भिडे | २,००० |
| हेमंत दिनकर देवधर, दापोली | ५,००० |
| विशाल विष्णू देवधर, दादर | ५,००० |
| वेदांग देवधर, डोंबिवली | १०० |
| योगिता विनोद देवधर, डोंबिवली | १,००० |
| अनंत व जयश्री देवधर, पुणे | २,००० |
| अनुराधा चिंतामणी देवधर, कल्याण | ५०,००० |
| (चिंतामणी केशव देवधर स्मृत्यर्थ) | |
| शिरीष हरि ढमढेरे, पुणे | १५,००० |
| डॉ. केदार कमलाकर देवधर, दादर | ५०,००१ |
| मेघना मनाहर जांभेकर, गिरगाव | १०,००० |
| स्वाती गजानन देवधर, ठाणे | ५,००० |
| शिरिष कांत देवधर, नाशिक | ११,००० |
| नंदिनी/ अरविंद देवधर, कॅनडा | १,००० |
| सचिन देवधर, सिल्वासा | १,००० |
| प्राजक्ता देवधर-जोशी, रोहा | १,००० |
| स्मिता गिरिष देवधर, कऱ्हाड | १०,००० |
| श्रीकांत माधव देवधर, विलेपार्ले | ५,००० |
| (सुधा व माधव देवधर स्मृत्यर्थ) | |
| कुंदा पाटकर (दीक्षित), डोंबिवली | २०० |
| प्रभाकर देवधर, नालासोपारा | ५,००० |
| एकूण | ३,४०,०२४ |

## परिशिष्ठ – ११

### वाढदिवस देणगी

| | |
|---|---|
| सुरेश विश्वनाथ देवधर, बोरिवली | ७,५०१ |
| डॉ. सुगंधा सुरेश देवधर | १,००० |
| अकल्पिता चिंतामणी देवधर | १,१०० |
| मीरा जगदीश देवधर, सांगली | १,००० |
| एकूण | १०,६०१ |

## परिशिष्ठ – १२

### शैक्षणिक मदत

| | |
|---|---|
| अनुश्री अनुराग ढमढेरे, इंदूर | ५,००० |
| रेणुका प्रकाश देवधर, बदलापूर | १०,००० |
| प्रसाद प्रकाश देवधर, बदलापूर | ५,००० |
| एकूण | २०,००० |

## परिशिष्ठ ७

### बँकेतील ठेवी

| बँकेचे नाव | वर्ष २०२२-२३ | वर्ष २०२१-२२ |
|---|---|---|
| बँक ऑफ महाराष्ट्र, डोंबिवली | १७,२७,४३१ | १३,३९,४०९ |
| आयडीबीआय बँक, कल्याण | ९,२३,७४१ | १५,००,००० |
| सारस्वत बँक, गिरगांव | ३,००,००० | ३,००,००० |
| एन.के.जी.एस.बी., डोंबिवली | ४,५०,००० | ५०,००० |
| ठाणे भारत सहकारी बँक, ठाणे | १,००,००० | १,००,००० |
| कॉसमॉस बँक, डोंबिवली | ४,५०,००० | १,००,००० |
| डोंबिवली नागरी सह. बँक | १,००,००० | १,००,००० |
| एकूण | ४०,५१,१७२ | ३४,८९,४०९ |

## परिशिष्ठ ८

### बँकेतील ठेवींवरील व्याज

| बँकेचे नाव | वर्ष २०२२-२३ | वर्ष २०२१-२२ |
|---|---|---|
| बँक ऑफ महाराष्ट्र, डोंबिवली | १,२९,८१९ | ४७,४६२ |
| आयडीबीआय बँक, कल्याण | १,०६,८३३ | ४३,१८२ |
| सारस्वत बँक, गिरगांव | २०,४०३ | १५,५०८ |
| एन.के.जी.एस.बी., डोंबिवली | ३,२९० | २,८४८ |
| ठाणे भारत सहकारी बँक, ठाणे | ५,२५२ | ५,५६९ |
| कॉसमॉस बँक, डोंबिवली | १५,०५४ | ५,५०६ |
| डोंबिवली नागरी सह. बँक | ५,००० | ५,३७५ |
| एकूण | २,८५,६५१ | १,२५,४५० |

## परिशिष्ठ – १३

### वैद्यकीय मदत

| | |
|---|---|
| प्रकाश बाळकृष्ण देवधर, बदलापूर | १५,००० |
| एकूण | १५,००० |

## परिशिष्ठ ६

### बँकेतील शिल्लक (३१/३/२०२३ रोजी)

| | |
|---|---|
| बँक ऑफ महाराष्ट्र, डोंबिवली | ९५,६२० |
| आयडीबीआय बँक, कल्याण | १,२४,४४७ |
| सारस्वत बँक, गिरगांव | २९,७४२ |
| एन.के.जी.एस.बी., डोंबिवली | ७,२०८ |
| एन.के.जी.एस.बी., जोगेश्वरी | २,०२३ |
| ठाणे भारत सहकारी बँक, ठाणे | १३,०९५ |
| स्टेट बँक ऑफ इंडिया, अंधेरी | ६,४०५ |
| एकूण | २,७८,५४० |

## परिशिष्ठ ९

### बचत खात्यांवरील व्याज (३१/३/२०२३ रोजी)

| | |
|---|---|
| बँक ऑफ महाराष्ट्र, डोंबिवली | ५,५६९ |
| आयडीबीआय बँक, कल्याण | ४,१२१ |
| सारस्वत बँक, गिरगांव | ५३७ |
| एन.के.जी.एस.बी., डोंबिवली | २०९ |
| एन.के.जी.एस.बी., जोगेश्वरी | १४१ |
| ठाणे भारत सहकारी बँक, ठाणे | २९० |
| एकूण | १०,८६७ |

## परिशिष्ठ १०

### संमेलन / स्मरणिका देणगी

| | |
|---|---|
| सुरेश देवधर, बोरिवली | १,०१,००० |
| विद्यानंद देवधर, कोल्हापूर | १५,००० |
| सुगंधा सुरेश देवधर, बोरिवली | १५,००० |
| मंजिरी समीर देवधर, डोंबिवली | ३,००० |
| प्रभात सुपर शॉपी, पुणे | ३,००० |
| आरुषी देवधर, पुणे | ५०० |
| आरोही देवधर, मुंबई | ५०० |
| अनघा देवधर | ५०० |
| मनिषा मुकुंद देवधर | ५०० |
| नितीन व मीनाक्षी देवधर, पुणे | ८०० |
| वसुंधरा व प्रमोद देवधर | ३०० |
| गीतांजली सुनिल देवधर, वाई | ५०० |
| क्षमा देवधर | ५०० |
| विश्वास देवधर, चिपळूण | ५,००० |
| विनायक देवधर, नाशिक | ५०० |
| नेहा दीक्षित | ५०० |
| अनुजा सतीश देवधर, ठाणे | ३०० |
| मंजिरी जगदीश देवधर, सांगली | ३०० |
| जगदीश देवधर, सांगली | ३०० |
| मधुरा देवधर - जोग | ५०० |
| उमेश व चित्रलेखा देवधर | ३०० |
| एकूण | १,४८,८०० |

टीप : १) मंडळाचे सर्व हिशोब कॅशबेसिसवर असतात.

२) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेत मान्य झालेल्या ठरावानुसार वास्तूप्रकल्प निधी हा श्री केशवराज देवस्थान निधीमध्ये वर्ग करण्यात आला आहे.

Report of an auditor relating to accounts audited under Sub-Section (2) of section 33 & 34 and rule 19 of the Bombay Public Trusts Act.

Registration No. A/F/16745 dt 14/1/2009

Name of the Public Trust - **DEODHAR MANDAL**


For the year ending 31st March 2023

| | | |
|---|---|---|
| a) | Whether accounts are maintained and in accordance with the provisions of the Act and the rules ; | Yes |
| b) | Whether receipts and disburements are properly and correctly shown in the accounts; | Yes |
| c) | Whether the cash balance and vouchers in the custody of the manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts; | Yes |
| d) | Whether all books, deeds, accounts, vouchers or other documents or records required by the auditor were produced before him: | Yes |
| e) | Whether a register of movable and immovable properties is properly maintained, the changes therein are communicated from time to time the regional office, and the defects and inaccuracies mentioned in the previous audit report have been duly complied with ; | NA |
| f) | Whether the manager or trustee or any other person required by the auditor to appear before him did so and furnised the necessary information required by him ; | Yes |
| g) | Whether any property or funds of the Trust were applied for any object or purpose other than the object or purpose of the Trust ; | No |
| h) | The amounts of outstadings for more than one year and the amounts written off, if any; | NA |
| i) | Whether tenders were invited for repairs or construction involoving expenditure exceeding Rs. 5,000/- : | NA |
| j) | Whether any money of the public trust has been invested contrary to the provisions of Section 35; | No |
| k) | Alienations, if any, of the immovable property contrary to the provisions 36 which have come to the notice of the auditor; | No |
| l) | All cases of irregular, illegal or improper expenditure, or failure or omission to recover monies or other property belonging to the pubic trust or of loss or waste of money or other property therof, and whether such expenditure, failure, omission, loss or waste was caused in consequence of breach of trust or misapplication or any other misconduct on the part of the trustees or any other person while in the management of the trust ; | NA |
| m) | Whether the budget has been filed in the form provided by rule 16 A ; | Yes |
| n) | Whether the maximum and minimum number of the trustees is maintained ; | Yes |
| o) | Whether the meetings are held regularly as provided in such instrument ; | Yes |
| p) | Whether the minute books of the proceedings of the meeting is maintained ; | Yes |
| q) | Whether any of the trustees has any interest in the investment of the trust ; | No |
| r) | Whether any of the trustees is a debtor or creditor of the trust ; | No |
| s) | Whether the irregularities pointed out by the auditors in the accounts of the previous year have been duly complied with by the trustees during the period of audit ; | NA |
| t) | Any special matter which the auditor may think fit or necessary to bring to the notice of the Deputy or Assistant Charity Commissioner. | Nil |

Dated : 1 / 6 /2023
At : Mumbai

# विद्यार्थी स्पेशल शब्दकोडे

- रचनाकार : **श्री. पु. गो. देवधर,** पुणे




**आडवे शब्द :–**

१) अभ्यास करणे ४) आनंद मेळावा ६) तीर ७) ताक ९) शिकण्यास सुरुवात येथे होते १०) **कुसर ११) सायन्स १३) खासगी शिक्षक १५) उच्च शिक्षणाचे ठिकाण १७) योद्धा १९) फळ्यावर लिहिण्याचे साधन २०) विद्या देणारी, गुरू

**उभे शब्द :–**

१) शिक्षक २) श्रमाची सफता ३) पुरुष ४) मैत्र, सोबत ५) ठिकाणांची रेखाचित्र ८) संख्या १२) विद्यार्थ्यांचे आईवडील १३) गुरू १४) वेळेप्रमाणे १५) उच्च शिक्षणाची संस्था १६) परीक्षेसाठी तयारी पत्रक १८) शाळेत त्यावर लिहून शिकवितात.

(उत्तरे इतरत्र)

# अविनाश दिवाकर देवधर यांना भावपूर्ण श्रद्धांजली

नरेश कृष्णाजी दीक्षित (डोंबिवली)

अविनाश दिवाकर देवधर यांच्या नांवामागे कै. लिहिण्याचे धारिष्ट्य होत नाही. ते खरे असले तरी पटत नाही. त्यांच्यासारखे हुरहुन्नरी व्यक्तिमत्व, सर्वांना बरोबर घेऊन जाण्याची कला असलेला, सभास्थानी चार शब्द बोलण्यास उभे राहिल्यावर संयोजकांना शांतता राखा असे श्रोत्यांना सुचाविण्याची आवश्यकताच भासणार नाही असा वक्ता दशसहस्त्रेषु अशी उक्ती सार्थ करणारी व्यक्ती, म्हणजेच अविनाशकाका. ते आज आपल्यात नाहीत, हे सत्य आहे. देवधर मंडळाचा जीवनगौरव पुरस्कार सपत्नीक स्वीकारण्यासाठी ते सांगलीला झालेल्या देवधर मंडळाच्या वार्षिक स्नेहसंमेलनास हजर राहून व पुरस्कार स्वीकारून, त्यांचे मूळ घर सातारा येथे थोडेफार वास्तव्य करून मंगळवारी रात्री डोंबिवलीला परतले आणि रात्री झोपले ते सकाळी उठलेच नाहीत. वाढदिवस त्यांच्यासह नातेवाईकांचा झाकोळलाच. पतीपत्नी अशा दोघांनाही एकाच वेळी देवधर मंडळाचा पुरस्कार मिळणे ह्या दुग्धशर्करा योगास विरजण लागले. जीवनगौरव पुरस्काराची फ्रेम आणि मानचिन्ह परत परत पाहण्याचा आनंद त्यांना घेताच आला नाही. देवाला अशी काय घाई झाली होती कोण जाणे की द्यायचं नि लगेच निरुपयोगी करायचं यात त्याला काय आनंद आहे माहीत नाही, पण हे सत्य स्वीकारावे लागते. सदुसष्ट म्हणजे देवाघरी जायचं वय नव्हे.



१५ जून २०२१ च्या वाटचाल मध्ये कै. रमेश हणमंत देवधर यांना श्रद्धांजली वाहताना काकाच्या (रमेश देवधर) शब्दाला पुतण्या जागला आणि त्यांच्या माध्यमातून देवधर मंडळाचे काम व्यवस्थित चालू झाले, असे मी लिहिले होते. तो पुतण्या म्हणजेच अविनाश देवधर. देवधर मंडळाचा एखादा कार्यक्रम ठरला तर साध्या फोनने १०-१५ कार्यकर्ते उभे करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात होते. डोंबिवलीत २०१२ पासून झालेल्या प्रत्येक संमेलनात आणि वार्षिक सभेवर त्यांची छाप असे, ते उपस्थित नाहीत असे कधीच झाले नाही. त्यांची अनुपस्थिती कशी स्वीकारायची हा माझ्यासारख्या कार्यकर्त्यासमोर मोठा पण उत्तरच नसलेला प्रश्न उभा असेल.

त्यांना पिढीजात मिळालेल्या ज्ञानाच्या वारशाने व स्वकष्टार्जित अभ्यासाने कांही औषधे त्यांनी सिद्ध केली होती हे सर्वांना ठाऊकच आहे. त्याचा फायदा अनेकांनी घेतला आहे, अनुभवला आहे. त्यासंबंधी ग्रँटरोडच्या सौ. अश्विनी दिनकर करंदीकर यांनी डिसेंबर २०१५ च्या वाटचाल मध्ये एक पत्र लिहिले होते. त्यात त्यांनी श्री. करंदीकरांची मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेतून निव्वळ बाहेरून लावण्याच्या औषधाने कशी मुक्तता झाली हे सविस्तर वर्णिलेले आहे, त्याचे स्मरण होते. माझी एक मावस बहीण आगाशी (विरार) येथून औषधे घेण्यासाठी येत असे.

अशा या व्यक्तिमत्वास, कै. अविनाश दिवाकर देवधर यांच्या आत्म्यास शांती लाभो अशी केशवराजाकडे प्रार्थना.

– **नरेश कृष्णाजी दीक्षित** सह
समस्त कल्याण व डोंबिवलीकर.

# डॉ. सुलभा देवधर रानडे यांचा सत्कार




डॉ. सौ. सुलभा विष्णू रानडे (माहेरच्या कु. सुलभा नारायण देवधर) या आपल्या माहेरवाशिणीचा नुकताच त्यांच्या यशस्वी कारकिर्दीबद्दल सत्कार करण्यात आला. जागतिक महिला दिनानिमित्त गोरेगांव येथे दि. १२ मार्च रोजी आमदार मा. सौ. विद्याताई ठाकूर यांच्या हस्ते डॉ. सुलभा यांचा सत्कार करण्यात आला.

सन १९४१ मध्ये गिरगावात मध्यमवर्गीय कुटुंबात डॉ. सुलभा यांचा जन्म झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गिरगावात तर सिद्धार्थ कॉलेजमधून इंटर सायन्सची परीक्षा त्या उच्च श्रेणीत उत्तीर्ण झाल्या. त्यानंतर जी. एस. मेडिकल कॉलेजमधून त्यांनी एम.बी.बी.एस. पूर्ण केले. मुंबई महानगरपालिकेत त्या आरोग्य अधिकारी म्हणून नोकरीत रुजू झाल्या. सन १९६६ मध्ये डॉ. विष्णू वि. रानडे यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या आणि गोरेगाव (पू.) येथे वास्तव्यास आल्या. डॉ. रानडे हे व्हेटर्नरी कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत होते.

सन १९८० मध्ये नोकरीतून निवृत्त होऊन डॉ. सुलभा यांनी स्वत:चा दवाखाना सुरू केला. मध्यंतरीच्या काळात त्यांनी दोन पदविकाही मिळविल्या. वयाच्या ८० व्या वर्षापर्यंत त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात अविरत काम केले. रोग्याच्या आजाराचे मूळ कारण शोधून योग्य उपचार करणे हे त्यांच्या रक्तातच आहे. त्यांना भेटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीत, कुटुंबात त्या एकरूप होऊन जात.

डॉ. सुलभा व डॉ. रानडे उभयात गोरेगावातील प्रत्येक उपक्रमात सहभागी होतात. गोरेगांव येथील मसुराश्रम येथे होणाऱ्या निरनिराळ्या उत्सवात त्यांचा सहभाग असतो. विशेष म्हणजे गेली पंचवीस वर्षे त्यांनी रामनवमीला गीतरामायणाचे कार्यक्रम केले आहेत. डॉ. सुलभा कार्यक्रमाचे संचलन करतात तसेच गीत विवेकानंद, गीता गीतातली या कार्यक्रमाचे सादरीकरणही करतात. आणि हे सर्व काम विनामूल्य करतात. संगीतासारखा छंद जोपासून अनेक नवीन कलाकारांना त्यांनी पुढे आणले आहे. आपल्या धकाधकीच्या जीवनात अशा काही गोष्टींनी मन:स्वास्थ्य लाभते असे त्यांचे म्हणणे असते.

***

## वाटचाल वितरण संबंधी निवेदन

नमस्कार मंडळी.

आपलं वाटचाल त्रैमासिक पोस्टाद्वारे पोहोचण्यास बऱ्याचदा खूप उशीर होतो किंवा मिळतच नाही अशा तक्रारी येतात. म्हणून ऑनलाइन पर्यायही उपलब्ध केला आहे. आपल्या व्हाट्सअप च्या सर्व समूहांत ऑनलाईन वाटचाल ही पाठवला जातोच. पण तरीही इतर अनेक पोस्ट्सच्या गर्दीत तो पटकन पाहिला जात नाही. (miss होतो)

ज्या सभासद कुलबांधव आणि भगिनींना फक्त ऑनलाइन च पाठवून हवा असेल त्यांनी खाली दिलेल्या व्हाट्सअप क्रमांकावर व्हाट्सअप मेसेज करावा. अथवा ईमेल आयडीवर इ मेल पाठवावा.

त्या मेसेज मध्ये तुमचं संपूर्ण नांव, संपूर्ण पत्ता, संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी ही संपूर्ण माहिती नमूद करावी. वाटचाल अंक तुमच्या ई-मेल आयडीवर पाठवायचा आहे की व्हाट्सअप क्रमांकावर पाठवायचा आहे ते कृपया स्पष्ट लिहावे. आपण निवडलेला हा पर्याय कायमस्वरुपी असेल, त्यानंतर त्यात शक्यतो बदल करू नये. ह्याची कृपया नोंद घ्यावी. ही नम्र विनंती. धन्यवाद.

-पूर्वा देवधर.

९८६९९३९०७२

येथे फक्त मेसेज पाठवणे, (फोन करू नये)

अथवा

purdeo.77@gmail.com येथे ईमेल पाठवावा

## आर्थिक मदतीसाठी आवाहन

देवधर मंडळाच्या सर्व कुलबंधु-भगिनींना सादर नमस्कार.

देवधर कुलबंधू-भगिनींना अडचणीच्या काळात मदत करणे हे कर्तव्य असल्याची मंडळाची भावना आहे. त्या भावनेपोटी मंडळातील कोणाला आजारपणासाठी मदत लागली, शैक्षणिक मदत लागली अथवा नैसर्गिक आपत्तीमुळे अर्थसाहाय्य लागले तर मंडळाच्या ठरलेल्या धोरणांप्रमाणे संबंधीत गरजू कुलबांधवाला अथवा भगिनीला मंडळ अवश्य मदत करते. अर्थात ही मदत मंडळ आपल्या कुलुबंधु-भगिनींकडून आलेल्या आर्थिक मदतीच्या जीवावरच करीत आहे त्यामुळे आपणा सर्वांना पुन्हा एकदा कळकळीचे आवाहन की मंडळाच्या शिक्षण निधी, आरोग्य निधी, आपत्ती निवारण निधी यासाठी मनापासून मदत करा. आपण केलेली मदत आपल्याच एका कुलबंधूच्या आयुष्याची गाडी रुळावर येण्यासाठी उपयोगी पडेल.

देवधर मंडळाच्या सर्वसाधारण सभेत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे दरवर्षी प्रत्येक आजीव सभासदाने प्रत्येकी रुपये ३००/- संवर्धन देणगी म्हणून द्यावी अशी विनंती सर्व सभासदांना करण्यात येत आहे. वार्षिक सभा, वाटचाल असे इतर गोष्टींसाठी निधी उपलब्ध होऊ शकेल.

देवधर मंडळाचे कार्यकारी मंडळ हे सर्व कुलबंधु-भगिनींचे प्रतिनिधीत्व करते, कारभार सांभाळते. जबाबदारी मात्र आपल्या सर्वांचीच. नाही का?

# मंडळातर्फे देण्यात येणाऱ्या शैक्षणिक मदतीसंदर्भात

२०२३-२४ या शैक्षणिक वर्षासाठी मंडळाच्या नियमाप्रमाणे गरजू /हुशार कुल विद्यार्थ्यांना (मुले व मुली) शैक्षणिक मदत देण्यात येईल.

आपले अर्ज कुरियरने, पोस्टाने अथवा ई-मेल द्वारे सहकार्यवाह सौ. पूर्वा देवधर यांना १५ ऑगस्ट २०२३ पूर्वी पाठवावेत. अर्ज पाठविल्यावर कृपया त्यांना दूरध्वनीवरून तसे सूचित करावे.

सदर अर्जात

१) विद्यार्थ्याचे नाव
२) गेल्या वर्षीचे गुणपत्रक (झेरॉक्स)
३) शैक्षणिक वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यालयाचे/महाविद्यालयाचे/शिक्षण संस्थेचे मूळ बोनाफाईड सर्टिफिकेट
४) पालकांच्या उत्पन्नाचा दाखला अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

अर्जात खालील सदरांसह आपली पूर्ण माहिती लिहावी.

- ✻ पालकाचे नाव, पत्ता (पिनकोड व टेलिफोन नंबर सह)
- ✻ विद्यार्थ्याचे पूर्ण नाव, पत्ता, जन्मदिनांक
- ✻ यंदा प्रवेश घेतलेली इयत्ता
- ✻ पालकाचे वार्षिक उत्पन्न
- ✻ पालकाच्या उत्पन्नाच्या दाखल्याऐवजी दोन स्थानिक प्रतिनिधींच्या किंवा दोन आजीव सभासदांच्या शिफरशी (घरातील अथवा नात्यातील आजीव सभासदांखेरीज)
- ✻ बँक खाते क्रमांक
- ✻ बँकेचे नाव व शाखेचे नाव
- ✻ पालकाची स्वाक्षरी
- ✻ दिनांक (अवश्य)

अपूर्ण अर्जांवर विचार केला जाणार नाही. काही तांत्रिक कारणाने (निकालास उशीर इ.) अर्ज पाठविण्यास उशीर होणार असेल तर आगाऊ कळविणे आवश्यक आहे. वरीलप्रमाणे सर्व माहिती एकत्रित न आल्यास मदत पाठविणे शक्य होणार नाही.

पत्ता : पूर्वा प्रमोद देवधर (सहकार्यवाह)
११/१२, सी, दुसरा मजला, झावबा वाडी, ठाकूरद्वार, मुंबई ४००००२
मोबाईल : ९८६९९३९०७२
Email. : purdeo.77@gmail.com

✻✻✻

## शब्दकोड्याची उत्तरे

**आडवे शब्द :–**

१) अध्यापक ४) संमेलन ६) शर ७) तक्र ९) शाळा १०) कला ११) शास्त्र १३) शिकवणी १५) विद्यालय १७) वीर १९) खडू २०) शिक्षिका

**उभे शब्द :–**

१) अध्ययन २) यश ४) संगत ५) नकाशा ८) क्रमांक १२) पालक १३) शिक्षक १४)वक्तशीर १५) विद्यापीठ १६) प्रश्नपत्रिका १८) फळा

# यंदाच्या वार्षिक स्नेहसंमेलनातील काही क्षणचित्रे















सांगली संमेलनास
उपस्थित
सर्व देवधर
कुलबंधू-भगिनी

पोलीस अधिक्षक
सौ. अश्विनी देवधर सानप
(IPS) यांची कार्यकारिणीच्या
सदस्यांनी सदिच्छा भेट घेतली
(डावीकडून)
सौ. पूर्वा देवधर,
सौ. अश्विनी सानप,
अकल्पिता चिंतामणी देवधर,
श्री. समीर देवधर,
श्री. संतोष सानप



Book Packet
Containing periodical
R.N.I. No. : MAHMAR/2000/4869

प्रति,
माननीय

संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक श्री. वा. ना. देवधर यांचेसाठी आशिष देवधर यांनी साधना ऑफसेट, भारताचार्य वैद्य चौक, कल्याण येथे छापून, वैद्य वाडा, टिळक चौक, कल्याण (प.) ४२१३०१ येथे प्रसिद्ध केले.